# माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये माहिती मिळण्याबाबतच्या

## Format of application for obtaining information under the Right of Information Act, 2005

मिरा भाईंदर महानगरपालिका
जनसंपर्क विभाग
स.प./न.प./ज.प.
आवक क्र.. ८०/२०१८-१९..१५०५
दिनांक:- १२/०९/२०१८

## अर्जाचा नमुना
## Application Form

Rs.10 — 1 SEP 2018 — INDIA — TEN RUPEES

प्रति,
To, मिरा भाईंदर महानगरपालिका आयुक्त साहेब

१) अर्जदाराचे पूर्ण नाव : जितेंद्र अच्युत शेलार
Full Name of the applicant

२) अर्जदाराचा पूर्ण पत्ता : ००१ हरी निवास मिरा गाव मिरारोड पूर्व ४०११०७ मोबाईल क्र. 8652830789
Address

३) आवश्यक असलेल्या माहितीचा तपशील :
Particulars information required नगरसेविका पदाचा सन्मान न करता शिवीगाळ करणेबाबत

आयुक्त साहेब. आपणा कडे माहिती मागतो की सर्व सामान्य व्यक्ती च्या तक्रार ऐकणे व त्यास व्यक्ती वर राग काढणे शिवीगाळ करणे अशा नगरसेविकांच्या नगरसेविका पद रद्द करण्याचे अधिकार कोणा कडे आहेत त्या बाबतची माहिती मिळावी म्हणून माहिती अर्ज करीत आहे.
संबंधित विषय संबंधित विभागात पाठविण्यात यावा

माहिती ज्याच्याशी संबंधीत असले तो कालावधी # : 2018
The period to which the information relates

माहिती टपालाने मिळणे आवश्यक आहे किंवा स्वतः घेऊन जाणार आहात किंवा कसे
Whether information is required by post or in person स्वता घेऊन जानार
(जादा शुल्कामध्ये प्रत्यक्ष टपाल खर्चाचा समावेश होईल ) : स्वतः करनार

( The actual postal charges shall be included in additional fees )

जर टपालाने माहिती हवी असेल तर कोणत्या टपालाने हवी आहे : आयुक्त दालन
In case by post
( साध्या, नोंदणीकृत किंवा शीघ्र डाकने ) नाही
(Ordinary, Registered or Speed )

४) अर्जदार दारिद्रयरेषेखाली आहे किंवा कसे : होय/नाही नाही
Whether the applicant is below poverty line : (~~Yes~~/No)
( असल्यास त्याच्या पुराव्यादाखल छायाप्रत जोडावी )

जितेंद्र
अर्जदाराची सही
Signature of the Applicant

दिनांक
Date 12-9-2018

ठिकाण
Place भाईंदर

*विषय ठळक स्वरुपात दर्शविण्यात यावा (जसे शासकीय जमीन देणे/सेवाविषयक बाब/लायसेन्स इत्यादी )
Broad Category of the subject be indicated (such ) as grant of Govt. Land/Service matter/Licenses etc. )
# ज्या कालावधीची माहिती आवश्यक असेल तो संबंध कालावधी दर्शविण्यात यावा.
Relevant period for which information I required to be indicated
$ आवश्यक असलेल्या माहितीचा विशेष तपशील दर्शविण्यात यावा.
Specific details of the information is required to be indicated

016

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता.जि. ठाणे 401 101
नगरसचिव विभाग

जा.क्र.मनपा/सचिव/मा.अ./ ६० /2018 दिनांक :- २६ / ०९/2018

प्रति,
श्री. जितेंद्र अच्युत शेनॉय,
रुम नं. 001, हरी निवास,
मिरा गाव, मिरारोड (पूर्व).

**विषय :-** **केंद्र शासनाचा माहितीचा अधिकारी 2005.**
**माहिती मिळणेबाबत.**

**संदर्भ :-** **आपणांकडील दि. 12/09/2018 रोजीचा माहिती अधिकारातील अर्ज.**

महोदय,

उपरोक्त विषयांकित संदर्भित पत्रान्वये, आपण महापालिका सदस्यांचे नगरसेवक पद रद्द करणेबाबतचे अधिकार कोणास आहेत यासंबंधी माहितीची मागणी केलेली आहे.

त्याअनुषंगाने, आपणांस कळविण्यांत येते की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम 12 व 13 मध्ये पालिका सदस्यास पदावरुन दुर करणेबाबतच्या अधिकारासंबंधी तरतुद उपलब्ध आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम पुस्तकातील पान क्र. 93 व 94 च्या छायांकित प्रतिची सत्यप्रत सोबत जोडून देत आहोत. (एकूण पाने 2)

सदर माहितीबाबत आपले समाधान न झाल्यास अपिलीय अधिकारी तथा नगरसचिव श्री. वासुदेव शिरवळकर, नगरसचिव विभाग, तिसरा मजला, मुख्य कार्यालय, स्व. इंदिरा गांधी भवन, भाईंदर (प.) यांचेकडे 30 दिवसात प्रथम अपिल दाखल करता येईल.

कळावे.

माहिती मिळाली
जितेंद्र
27-9-2018

(कैलास दा. म्हात्रे)
जनमाहिती अधिकारी तथा लिपीक
मिरा भाईंदर महानगरपालिका
(भ्रमणध्वनी क्र. 9867077799)

pc 2\\Virendra\d\p\Mahiti Adhikar\Letter - Jitendra Shenoy.docx

मिरा - भाईंदर महानगरपालिका
मुख्य कार्यालय
भाईंदर (प.)



**११. पालिका सदस्य म्हणून पदावर राहण्यास असमर्थता.–**

जर कोणताही पालिका सदस्य आपल्या पदावधीत कोणत्याही वेळी —

(अ) कलम १० च्या तरतुदीन्वये पालिका सदस्य म्हणून राहण्यास अनर्ह होईल;

(ब) तात्पुरता आजार किंवा महानगरपालिकेने मान्य केलेले कोणतेही अन्य कारण याव्यतिरिक्त अन्य प्रसंगी लागोपाठ तीन महिन्यांच्या अवधीत महानगरपालिकेच्या सभांना स्वतः गैरहजर राहील;

(क) कोणत्याही कारणामुळे- मग ते महानगरपालिकेने मान्य केलेले असो वा नसो- लागोपाठ सहा महिन्यांच्या अवधीत महानगरपालिकेच्या सभांना स्वतः गैरहजर राहील, किंवा हजर राहण्यास असमर्थ होईल; किंवा

(ड) ज्या बाबीत त्याचा स्वतःचा किंवा आपल्या भागीदारांमार्फत प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या कलम १०, पोट-कलम (२), खंड (ब) मध्ये वर्णन केल्याप्रमाणे असलेला कोणताही भाग किंवा हितसंबंध असेल किंवा ज्याबाबतीत त्याचा पक्षकाराच्या, प्रकर्त्यांच्या किंवा अन्य व्यक्तींच्या वतीने **व्यवसायदृष्ट्या हितसंबंध असेल अशा कोणत्याही बाबींसंबंधी चर्चा चालू असताना त्या वेळी मत देऊन किंवा तील भाग घेऊन किंवा अशा बाबींसंबंधी कोणताही प्रश्न विचारून महानगरपालिकेचा सदस्य किंवा महानगरपालिकेच्या कोणत्याही समितीचा सदस्य या नात्याने काम करील तर, त्याचे पालिका सदस्य म्हणून पद धारण करणे बंद होईल.**

**१२. अनर्हतेसंबंधीच्या प्रश्नांचा निर्णय न्यायाधीशाने करणे.–**

(१) एखाद्या पालिका सदस्याचे कलम ११ अन्वये पालिका सदस्य म्हणून पद धारण करण्याचे बंद झाले आहे किंवा काय याविषयी कोणतीही शंका किंवा वाद उद्भवल्यास अशा पालिका सदस्यास किंवा कोणत्याही अन्य पालिका सदस्यास तो प्रश्न न्यायाधीशाकडे पाठवता येईल आणि महानगरपालिकेने विनंती केल्यास, आयुक्ताने तो प्रश्न न्यायाधीशाकडे पाठविला पाहिजे.

(२) पोट-कलम (१) अन्वये असा प्रश्न न्यायाधीशाकडे पाठवण्यात आल्यावर न्यायाधीश या अधिनियमांद्वारे किंवा तदन्वये तरतूद केलेल्या रीतीने चौकशी करून अशा पालिका सदस्याचे पद धारण करण्याचे बंद झाले आहे, असा निर्णय देईपर्यंत असा पालिका सदस्य अनर्ह झाला आहे असे मानले जाणार नाही.

[1][**१३. पालिका सदस्य पदावरून काढून टाकण्यास पात्र ठरणे.–**

(१) (अ) जर कोणताही पालिका सदस्य, पालिका सदस्य म्हणून असलेल्या त्याच्या चालू पदावधीमध्ये किंवा चालू पदावधीच्या लगतपूर्वीच्या पदावधीमध्ये, पालिका सदस्य म्हणून त्याची कर्तव्ये बजावत असताना, कोणत्याही गैरवर्तणुकीबद्दल किंवा कोणत्याही अशोभनीय वर्तणुकीबद्दल दोषी ठरला असेल तर, राज्य शासनास, स्वतःहून किंवा महानगरपालिकेच्या शिफारशीवरून, त्या सदस्यास पदावरून दूर करता येईल.

(ब) जर कोणताही पालिका सदस्य, पालिका सदस्य या नात्याने आपली कर्तव्ये पार पाडण्यास असमर्थ झाला आहे, असे राज्य शासनाचे मत असेल तर, राज्य शासनास, एकूण पालिका सदस्यांपैकी कमीत कमी तीन-चतुर्थांश पालिका सदस्यांनी मत देऊन पाठिंबा दिलेल्या, महानगपालिकेच्या शिफारशीवरून, त्या पालिका सदस्याला पदावरून दूर करता येईल.

(२) पोट-कलम (१) च्या प्रयोजनार्थ, कोणत्याही पालिका सदस्यास दूर करण्याची शिफारस करणारा कोणताही ठराव महानगरपालिकेकडून आणि पदावरून दूर करण्याचा कोणताही आदेश राज्य शासनाकडून, तो ठराव किंवा आदेश, ज्या कोणत्याही पालिका सदस्याशी संबंधित असेल त्यास, अशी शिफारस किंवा यथास्थिती, आदेश का काढण्यात येऊ नये, याचे कारण दर्शविण्याची वाजवी संधी देण्यात आल्याखेरीज संमत करण्यात येणार नाही :

माहिती अधिकार [illegible] अंतर्गत
देण्यात आलेली [illegible] सत्यप्रत
जनमाहिती अधिकारी
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

परंतु असे की, महानगरपालिकेला त्याबाबतीत आवश्यक कारवाई करण्याकरिता एक महिन्याचा कालावधी दिल्याखेरीज, राज्य शासन स्वतःहून पालिका सदस्याला दूर करण्याचा कोणताही आदेश काढणार नाही.

(३) ज्या प्रकरणात, राज्य शासनाने पोट-कलम (१) अन्वये आदेश दिला आहे, अशा प्रत्येक प्रकरणामध्ये अशा पालिका सदस्यास राज्य शासनाने आदेश काढून निरर्हतेपासून मुक्त केले नसेल तर, अशा आदेशाच्या दिनांकापासून पाच वर्षांच्या कालावधीसाठी पालिका सदस्य म्हणून राहण्यास किंवा पालिका सदस्य होण्यास किंवा इतर एखाद्या स्थानिक प्राधिकरणाचा परिषद सदस्य किंवा सदस्य होण्यास निरर्ह असेल आणि असा निरर्हतेपासून मुक्त करणारा आदेश काढण्याचा अधिकार राज्य शासनास, याद्वारे देण्यात येत आहे.

(४) या कलमान्वये पालिका सदस्याला काढून टाकण्याबाबत अणि निरर्ह ठरविण्याबाबत कोणतीही शंका किंवा विवाद उद्‌भवल्यास, अशा पालिका सदस्यास आणि महानगरपालिकेच्या विनंतीवरून आयुक्तास न्यायाधीशाकडे त्याचा निर्देश (reference) करता येईल.]

**सुधारणा**

१. सन २००८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३, क. ४ अन्वये हे कलम मूळ कलमाऐवजी दाखल करण्यात आले.

## पालिका सदस्यांची निवडणूक

**[1][१४. राज्य निवडणूक आयोग.–**

(१) महानगरपालिकेच्या सर्व निवडणुकांसाठी मतदारयाद्या तयार करण्याच्या कामावर देखरेख ठेवणे, त्यासाठी निदेश देणे व त्यावर नियंत्रण ठेवणे आणि अशा सर्व निवडणुका घेणे ही कामे राज्य निवडणूक आयुक्ताकडे निहित असतील.

(२) राज्य निवडणूक आयुक्ताला, त्याच्या अधिकारांपैकी आणि कामांपैकी कोणतेही अधिकार व कामे, आदेशाद्वारे राज्य निवडणूक आयोगाच्या कोणत्याही अधिकाऱ्याकडे किंवा राज्य शासनाच्या, उप जिल्हाधिकाऱ्यापेक्षा कमी दर्जाचा नसेल अशा कोणत्याही अधिकाऱ्याकडे किंवा महानगरपालिकेच्या, सहायक पालिका आयुक्तापेक्षा कमी दर्जाचा नसेल अशा कोणत्याही अधिकाऱ्याकडे सोपवता येतील.

(३) हा अधिनियम किंवा नियम याअन्वये, मतदार याद्या तयार करणे आणि महानगरपालिकेच्या निवडणूक घेणे यांसाठी नेमण्यात आलेले किंवा विशेष रीतीने नेमण्यात आलेले सर्व अधिकारी आणि कर्मचारी राज्य निवडणूक आयुक्ताच्या देखरेखीखाली, निदेशानुसार व नियंत्रणाखाली काम करतील.

(४) या अधिनियमान्वये आणि नियमांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी राज्य निवडणूक आयुक्ताला न्याय्य आणि निःपक्षपाती निवडणुकांसाठी अधिनियमाच्या व नियमांच्या तरतुदींशी विसंगत नसतील असे विशेष किंवा सर्वसाधारण आदेश अथवा निदेश काढता येतील. .

**सुधारणा**

१. क. १४ हे सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१, क. ५६ अन्वये मूळ कलमाऐवजी समाविष्ट करण्यात आले.

**टीका**

**१. राज्य निवडणूक आयोग :–** पोट-कलम (१) मध्ये राज्य निवडणूक आयुक्ताचे अधिकार दिलेले आहेत. सदरहू अधिकार राज्य निवडणूक आयुक्तास महानगरपालिकेच्या निवडणुका घेण्यासाठी देण्यात आलेले आहेत. ते पुढीलप्रमाणे-

(१) महानगरपालिकेच्या निवडणुकांसाठी मतदारयाद्या तयार करण्याचे कामावर देखरेख ठेवणे.

(२) मतदार याद्या तयार करण्यासाठी मार्गदर्शन करणे. व त्यावर नियंत्रण ठेवणे.

(३) महानगरपालिकेच्या निवडणुका घेणे.

माहिती अधिकार २००५ अंतर्गत
देण्यात आलेली माहिती सत्यप्रत
जनमाहिती अधिकारी
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका